बीड । महाराष्ट्र
शनिवार दि.२१/२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२१
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

महाराष्ट्राचा बुलंद आवाज । दैनिक

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com




## मंत्रालयानंतर बीडमध्ये एसीबीची धाड

# लाचखोर तहसीलदार व्यंकटेश मुंडे अडकला जाळ्यात

परळी । प्रतिनिधी

सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार थेट मंत्रालयापर्यंत पोहोचला असून एसीबीच्या छाप्यात हा उघड झाल्याचं अवघ्या महाराष्ट्राने पाहिले. राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील लिपिकाला लाच घेताना रंगेहात पडकल्याची घटना ताजी असतानाचा,मुंबईतील मुलूंड येथे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यासही एबीसीने अटक केली आहे. आता, बीड जिल्ह्यातील परळीतून लाचप्रकरणाची मोठी घटना समोर आली असून चक्क तहसीलदारच जाळ्यात अडकला आहे.



परळीतील तहसीलदार व्यंकटेश मुंडे हे लाच प्रकरणात अडकल्याची घटना समोर आली आहे. तक्रारदारास सालन्सी प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांनी पन्नास हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती वीस हजार रुपये देण्याचे ठरले. मात्र, तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. एसीबीने रंगेहात पकडण्यासाठी सापळा रचला होता. मात्र, तक्रारदाराच्या हालचालीवर संशय आल्याने तहसीलदार मुंडे यांनी पैसे स्वीकारण्यास टाळाटाळ केल्याचे सांगितले. तरीही एसीबीने आवश्यक ते सर्व पुरावे संकलित करून व्यंकटेश मुंडे यांना ताब्यात घेतले असून ▶▶पान २ वर

## चक्क मंडपात दहावीची परीक्षा

बीड । प्रतिनिधी

दहावीच्या परीक्षेला  सुरुवात झाली असून तालुक्यातील कुर्ला येथील यशवंत विदयालयात जागेअभावी मंडप टाकून विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.  एकीकडे शिक्षण विभागाने कॉपी मुक्त अभियान सुरु केले आहे. यासाठी प्रत्येक परीक्षा केंद्रावर सिसिटीव्ही बसवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र बीड जिल्ह्यात अनेक परीक्षा केंद्रावर शासनाने घालून दिलेले नियम पायदळी तुडवले जात असल्याचे चित्र समोर आले आहे.बीड तालुक्यातील कुर्ला येथील यशवंत विद्यालय या परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने आणि शाळेला चारच खोल्या असल्याने शाळेसमोर चक्क मंडप टाकण्यात आला आहे. मंडप टाकून डेस्क मांडून विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागली आहे.यामुळे गावात जणूकाही एखादे लग्न असल्याप्रमाणे मंडप टाकून शाळेने परीक्षा घेण्याचा घेतलेला निर्णय ▶▶पान २ वर




## तंटामुक्तीच्या अध्यक्षा समोरच...

# एकमेकांत काठीने झाली मारामारी

केज । प्रतिनिधी

शेतामधून घराकडे जात असलेल्या भावाभावांचा रस्त्याचा वाद मिटविण्यासाठी तंटामुक्तीचे अध्यक्ष आणि भावाभावाची बैठक सुरू असताना भाऊ आणि त्यांच्या दोन मुलांनी एकाला लाठ्या काठ्यांनी मारहाण करून जखमी केले आहे. केज तालुक्यातील युसुफ वडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कौडगाव येथील रामभाऊ मुंडे व ज्ञानदेव मुंडे या दोन सख्ख्या भावात घराकडे जाणाऱ्या शेतातील रस्त्या वरून भांडणे झाली होती. ते भांडण मिटविण्यासाठी दि. १९ फेब्रुवारी रोजी त्यांची गावातील तंटामुक्त ▶▶पान २ वर

# सलग दोन दिवस जीवघेणा हल्ला करणारा पोलिसांच्या ताब्यात

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील सहयोग नगर परिसरात सर्वेश्वर मंदिराजवळ भरदिवसा झालेल्या मारहाणीच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात प्रमुख आरोपीला बीड शहर पोलिसांनी अवघ्या ४८ तासांत अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दिनांक १५ रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता एका अज्ञात व्यक्तीने मोबाईलवरून बीड शहर पोलीस ठाण्यास माहिती दिली की, सर्वेश्वर मंदिराजवळ



चार महिला व एका पुरुषाने एका व्यक्तीस बेदम मारहाण केली आहे. माहिती मिळताच झडख संदीप नेवरे व झडख महेश जाधव हे

### बीड शहर पोलिसांची तत्पर कारवाई

पथकासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. तपासात समोर आले की, सदाशिव धोंडिबा कोकाट (रा. पांडुरंग नगर, बहिरवाडी, बीड) हे आपल्या मुलासोबत सामान्य रुग्णालयाकडे जात असताना दोन महिला आरोपींनी त्यांना अडवून मोटारसायकलची चावी काढून घेतली. वयोवृद्ध असल्याने ▶▶पान २ वर




## बीडमध्ये मध्यरात्री स्कॉर्पिओ चोरीस

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यात दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ झाल्याचे दिसत आहे. यातच आता बीड शहरातील राजीव गांधी चौक परिसरात मध्यरात्री चोरट्यांनी धाडसी चोरी करत घरासमोर उभी असलेली स्कॉर्पिओ गाडी लंपास केल्याची घटना घडली आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १९ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास एका स्विफ्ट कारमधून आलेल्या चोरट्यांनी घरासमोर उभी असलेली चक ४४ -- ७५७५ क्रमांकाची स्कॉर्पिओ काही मिनिटांतच चोरून नेली. चोरटे अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आले असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून दिसून येत आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा सुरू आहे. संबंधित प्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत आहे. ▶▶पान २ वर

# पळून नेलेल्या मुलीची सुटका

केज । प्रतिनिधी

आई-वडील घरी नसताना ब्युटीपार्लरला जाते. असे सांगून घरा बाहेर गेलेली १२ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलगी, ही बेपत्ता झाली होती. तिचा पोलिसांनी तपास घेऊन तिला पळवून नेणाऱ्या युवकासह ताब्यात घेत तिची सुटका केली आहे. या बाबतची

### अपहरणकर्ता पोलिसांच्या ताब्यात

माहिती अशी की, केज तालुक्यातील युसुफवडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या गावातील १२ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेली मुलगी ही तिचे आई-वडील कामासाठी बाहेर गेल्या नंतर बेपत्ता झाली होती. आई-वडील घरी आल्या नंतर ती अल्पवयीन मुलगी घरी आढळून आली नाही. म्हणून त्यांनी चौकशी केली असता त्या दिवशी ती ब्युटीपार्लरला जात असल्याचे सांगून बाहेर गेली असल्याचे समजले. तिचा शोध घेतला असता ती आढळून आली नाही. म्हणून मुलीच्या ▶▶पान २ वर



बीड : आंदोलनविर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मराठा समाज भूषण पुरस्काराने  सन्मानित.

## पुढील वर्षी मराठ्यांनी सहकुटुंब

# शिवनेरीवर जाऊन शिवरायांच्या चरणी नतमस्तक व्हावे-मनोज जरांगे पाटील



बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज मल्टीपर्पज क्रीडांगणावर छत्रपती संभाजी राजे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य मर्दानी खेळांच्या कार्यक्रमाने बीडकरांचे लक्ष वेधून घेतले. तलवारबाजी, दांडपट्टा, लाठी-काठी यांसारख्या पारंपरिक युद्धकलेच्या थरारक प्रात्यक्षिकांनी उपस्थितांना शिवकालीन शौर्याची अनुभूती दिली. संपूर्ण मैदान जय शिवरायच्या घोषणांनी दुमदुमून गेले होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास मनोज जरांगे पाटील व इतर मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर जरांगे पाटील यांच्या आगमनावेळी पारंपरिक औक्षण करण्यात आले. गंगाधर नाना काळकुटे, दीपक काळकुटे व मराठा सेवकांच्या हस्ते त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आवाहन केले की, पुढील वर्षी मराठा बांधवांनी सहकुटुंब शिवनेरी किल्ल्यावर जाऊन शिवाजी महाराजांच्या चरणी नतमस्तक व्हावे. शिवरायांच्या विचारांवर चालत समाजहितासाठी एकत्र राहणे हीच खरी जयंती ठरेल. त्यांनी तरुणांनी व्यसनमुक्त राहून समाजकार्यात पुढे यावे, असेही स्पष्ट केले. कार्यक्रमात मराठा समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या सन्मान सोहळ्यामुळे वातावरणात उत्साहाचे चैतन्य निर्माण झाले. ▶▶पान २ वर

## रोहित्र मंजुरी प्रक्रियेला गती

# 'महावितरण'च्या आश्वासनानंतर कुलदीप करपेंचे आंदोलन स्थगित



केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र बसविण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांचे बेमुदत ठिय्या आंदोलन महावितरण कंपनीकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर शुक्रवारी (दि.२०) स्थगित करण्यात आले आहे. होळ उपकेंद्राच्या क्षमतेअभावी परिसरातील शेतकरी व वीज ग्राहकांना कमी दाब, वारंवार खंडित होणारा पुरवठा आणि शेतीपंपांच्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्यावतीने ११ डिसेंबर २०२५ रोजी निवेदन देऊन आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता. या आंदोलनाची दखल घेत बीडचे अधिक्षक अभियंता यांनी ३३/११ केव्ही होळ उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र ▶▶पान २ वर

## संपादकीय

# परीक्षार्थींना शुभेच्छा

विद्यार्थीजीवनातील अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेला आजपासून प्रारंभ होत आहे. सर्व परीक्षार्थींना निर्भेळ यशासाठी 'एकमत'च्या शुभेच्छा! महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित इयत्ता दहावीची (माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र) मुख्य परीक्षा आजपासून (२० फेब्रुवारी) सुरू होत असून ती १८ मार्चपर्यंत चालणार आहे. पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या माध्यमातून ही परीक्षा घेतली जाणार असून मंडळाने या परीक्षेसाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याची माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातून एकूण १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थ्यांनी नावनोंदणी केली आहे. यामध्ये ८ लाख ६५ हजार ७४० मुले, ७ लाख ४९ हजार ७३६ मुली आणि १३ ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांचा समावेश असून राज्यातील एकूण २३ हजार ६८३ शाळांमधून या विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मंडळाने ५,१११ मुख्य परीक्षा केंद्रांचे नियोजन केले आहे. मुख्य म्हणजे, एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये या उद्देशाने मंडळाने ९ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आवेदनपत्रे स्वीकारण्याची मुभा दिली होती. विद्यार्थ्यांच्या मनावरील परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी मंडळाने वेळापत्रकात महत्त्वाच्या विषयांच्या पेपरमध्ये पुरेसा खंड ठेवला आहे. परीक्षेसाठी मंडळाने प्रसिद्ध केलेले अधिकृत वेळापत्रकच ग्रा धरावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परीक्षार्थींना सकाळी १०.३० वाजता आणि दुपारच्या सत्रात २.३० वाजता परीक्षा दालनात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन गतवर्षीप्रमाणेच यंदाही परीक्षेच्या निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे जादा वेळ वाढवून देण्यात आली आहे.

परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी आणि 'कॉपीमुक्त' अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. राज्यात एकूण २७१ भरारी पथके तैनात करण्यात आली असून जिल्हाधिका–यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समित्या लक्ष ठेवणार आहेत. ज्या परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा उपलब्ध आहे तेथे परीक्षा कॅमेराबद्ध केली जाईल. याशिवाय परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, नियमांचे उल्लंघन करणा–यांवर अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी एसटी महामंडळाला नियमित बस सोडण्याच्या आणि वीज वितरण कंपनीला अखंडित वीजपुरवठा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती वाटते किंवा जे मानसिक दडपणाखाली आहेत, त्यांच्यासाठी राज्य मंडळाने १० तज्ज्ञ समुपदेशकांची नियुक्ती केली असून जिल्हा स्तरावरही समुपदेशक उपलब्ध करून दिले आहेत. अपरिहार्य कारणामुळे अंतर्गत मूल्यमापन परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी २० ते २४ मार्च २०२६ दरम्यान विशेष परीक्षेची सोय करण्यात आली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा विद्यार्थ्यांची नोंदणी ३ हजार ८७९ ने वाढली आहे. बारावीच्या परीक्षा सुरू होऊन नऊ दिवस झाले असताना राज्यात सामूहिक कॉपी प्रकरणे उघडकीस आल्याने आता दहावीच्या परीक्षा सुरू होताना गैरप्रकार रोखण्याचे आव्हान राज्य मंडळासमोर आहे. 'कॉपीमुक्त परीक्षा' हे साध्य करण्यासाठी दहावीच्या परीक्षेत गैरप्रकार होऊ नयेत म्हणून विशेष काळजी घेतली जाणार असल्याचे राज्य मंडळाचे अध्यक्ष नंदकुमार बेडसे यांनी सांगितले आहे. दहावीच्या परीक्षेसाठी गतवर्षी ५ हजार १३० परीक्षा केंद्रे होती. परंतु गैरप्रकार घडून आल्याने त्यातील ३१ परीक्षा केंद्र रद्द करण्यात आली. गतवर्षी ९३ कॉपी प्रकरणे आणि २२६ परीक्षेनंतरच्या काळात आढळून आलेले गैरप्रकार असे एकूण ३१९ गैरप्रकार आढळले आहेत. यंदा ५ हजार १११ केंद्रांवर परीक्षा होणार असून त्यातील ५५४ केंद्रांवर सीसीटीव्ही नाहीत. १९१ केंद्रे संवेदनशील असून त्यातील ४२ केंद्रांवर सीसीटीव्ही नसल्याने त्या केंद्रांकडे पथकांमार्फत अधिक गांभीर्याने लक्ष केंद्रित केले जाणार आहे. राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्याकरिता शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली २५ नोव्हेंबरला बैठक झाली. यात दिलेल्या आदेशानुसार परीक्षा केंद्रांवर परीक्षेशी निगडीत कर्मचा–यांकडून गैरप्रकार झाल्यास, संबंधित कर्मचा–यांवर कारवाई करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर जाताना आणि परीक्षा देताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. योग्य नियोजन, शांत मन आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर उत्तम यश मिळवता येते. परीक्षेच्या दिवशी वाहतूक कोंडीचा विचार करून घरातून लवकर निघणे गरजेचे आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक असते. उशीर झाल्यास अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. प्रवेशपत्र (हॉल तिकिट) आणि शाळेचे ओळखपत्र सोबत ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. याशिवाय आवश्यक साहित्य पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर, मोजपट्टी, कंपास, लेखन पॅड आणि पाण्याची बाटली सोबत ठेवावी. परीक्षागृहात कोणतेही पुस्तक, वही, मोबाईल फोन किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य नेण्यास सक्त मनाई आहे. नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई होऊ शकते. प्रश्नपत्रिका मिळेपर्यंत मन शांत ठेवा. प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर ती काळजीपूर्वक वाचा. एखादा प्रश्न अवघड वाटला तरी घाबरू नका आणि प्रश्न सोपा वाटला तरी घाई करू नका. वेळेचे योग्य नियोजन करून सर्व प्रश्न आत्मविश्वासाने सोडवा. उत्तरपत्रिकेवरील सर्व माहिती–आसन क्रमांक, विषय कोड अचूक आणि स्पष्ट लिहा. अक्षर सुवाच्य ठेवा. उत्तर पत्रिकेवर अनावश्यक लिहिणे किंवा खाडाखोड टाळा. बारकोड चिकटवण्यापूर्वी तो आपलाच असल्याची खात्री करा. परीक्षेपूर्वी पुरेशी झोप आणि हलका आहार घ्या. शेवटच्या क्षणी घाईघाईने अभ्यास करण्यापेक्षा आधी केलेल्या तयारीवर विश्वास ठेवा. सकारात्मक विचार ठेवा आणि तणावापासून दूर रहा. योग्य नियोजन, नियमांचे पालन आणि आत्मविश्वास यांच्या मदतीने तुम्ही नक्कीच चांगले यश मिळवू शकाल. तेव्हा तुम्हाला पुन्हा एकदा भरघोस यशासाठी शुभेच्छा!

# 'एनए'ची कटकट मिटली!

शेतजमिनीच्या निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी लागणारी बिनशेती अथवा अकृषिक (एन.ए.) परवानगीची अट आता कायमची रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकारने त्यासाठी जिल्हाधिका–यांचे अधिकार कमी करून ते थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्यानुसार नगररचना विभाग आणि स्थानिक प्राधिकरणाने दिलेली बांधकाम नकाशा परवानगी हीच 'एनए'परवानगी असणार आहे. त्यामुळे जिल्हाधिका–यांकडून स्वतंत्र बांधकाम परवानगीची गरज नाही. याशिवाय वार्षिक बिनशेती करदेखील रद्द करून राज्य सरकारने शेतजमीनधारकांना मोठा दिलासा दिला आहे. आतापर्यंत शेतजमीन बिनशेती करण्यासाठी जमीनमालकाला प्रथम स्थानिक प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावा लागत होता. त्यानंतर तो प्रस्ताव स्थानिक स्वराज्य संस्थेकडून जिल्हाधिका–यांकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवला जात होता. या दुहेरी प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ जात होता. अशी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याने नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागत होत्या. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार शेतजमीन बिनशेती करण्यासाठी लागणारी स्वतंत्र परवानगीची सक्ती रद्द केली. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करून तसे राजपत्र प्रसिद्ध केले आहे. अनेक बँका कर्ज देताना अकृषक सनदेचा आग्रह धरतात. मात्र, नियोजन प्राधिकरणाची परवानगी मिळाल्यावर बँकांनी सनदेसाठी आग्रह धरू नये. जिल्हाधिका–यांनी हे आदेश सर्व बँकांच्या निदर्शनास आणून द्यावेत, असेही निर्देश महसूल विभागाने दिले आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत सुधारणा करण्याबाबत हिवाळी अधिवेशनात याबाबतची रूपरेषा ठरली होती. त्यानुसार हा निर्णय घेत सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. हे सरकार जनतेच्या कल्याणासाठी काम करते, याचे प्रत्यंतर देणारा हा निर्णय आहे, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.

नव्या नियमांबरोबरच बांधकाम परवानगीसाठी 'बीपीएमएस' किंवा 'ऑटो डीसीआर'द्वारे ऑनलाईन अर्ज करता येणार असून बांधकाम परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ७/१२ उता–यात आपोआप फेरफार नोंद घेतली जाणार आहे. केवळ बांधकाम परवानगी मिळाली म्हणून 'भोगवटादार वर्ग–२'च्या (कमी श्रमाच्या जमिनी) दर्जामध्ये बदल होणार नाही. त्यांच्यासाठी आवश्यक असलेले नजराणा शुल्क भरावेच लागणार आहे, असे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे. नव्या नियमानुसार जर एखाद्या जमिनीचा वापर विकास आराखड्यानुसार अनुज्ञेय असेल तर नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगी हीच 'अकृषक परवानगी' मानली जाईल. यासाठी जिल्हाधिका–यांच्या स्वतंत्र परवानगीची किंवा सनदेची गरज राहणार नाही. ज्या नागरिकांचा अकृषक कर थकित आहे, त्यांना दिलासा देताना राज्य सरकारने या सुधारणेच्या दिनांकापर्यंतचा थकित कर वसूल करण्यापासून सूट दिली आहे. मात्र, ज्या जमिनी २००१ पूर्वी किंवा त्यानंतर बिनशेती झाल्या आहेत, त्यांच्या मालकांना या शासन निर्णयापासून एक वर्षाच्या आत विहित दराने एकरकमी अधिमूल्य भरावे लागणार आहे. दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर रद्द करून त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार टप्पानिहाय एकरकमी 'रूपांतरण अधिमूल्य' आकारले जाईल. त्यासाठी १ हजार चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्रफळासाठी चालू बाजार मूल्याच्या ०.१० टक्के, तर १००१ ते ४००० चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रफळासाठी ०.२५ टक्के आणि ४ हजार चौ.मी. पेक्षा जास्त असलेल्या क्षेत्रफळासाठी चालू बाजार मूल्याच्या ०.५० टक्क्यानुसार दर आकारले जाणार आहेत. वार्षिक एनए कर रद्द केल्यामुळे नागरिकांना व शेतक–यांना मोठा दिलासा मिळेल. ग्रामीण भागात आपल्याच मालकीच्या जमिनीवरील विकासकामासंदर्भात प्रक्रिया अधिक वेगवान होईल. भ्रष्टाचार कमी होईल आणि जमीन विकास सुलभ होईल असे सांगितले जात आहे. राज्यातील जमीन मालक आणि घर बांधण्याचे स्वप्न पाहणा–या नागरिकांना एनएसाठी सरकारी कार्यालयांच्या फे–या माराव्या लागणार नाहीत किंवा जिल्हाधिका–यांच्या सहीसाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. नव्या नियमामुळे प्रक्रियेत सुसूत्रता आणि पारदर्शकता येणार आहे. मध्यस्थांमुळे होणारा विलंब आणि संभाव्य भ्रष्टाचाराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सर्वसामान्य नागरिकांना आता स्वत:चे घर बांधणे किंवा लहान–मोठे गृहप्रकल्प उभारणे अधिक सुलभ होणार असून राज्यातील बांधकाम क्षेत्रालाही या निर्णयाचा सकारात्मक फायदा होणार आहे. रुपांतरीत अधिमूल्यांची काही रक्कमही स्थानिक प्राधिकरणाला मिळणार आहे. अ वर्ग महानगरपालिका क्षेत्रात प्राप्त होणा–या रकमेतून ३० टक्के ही संबंधित महापालिकेला मिळेल. तर इतर स्थानिक प्राधिकरणांना ५० टक्के रक्कम मिळेल. जिल्हा परिषदांना ५० टक्के रक्कम मिळणार असून त्यातील २५ टक्के रक्कम ही संबंधित ग्रामपंचायतींना मिळणार आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नात सुद्धा वाढ होणार आहे. यापूर्वी राज्यात कोणत्याही बांधकामासाठी जमीन 'बिनशेती' करून घेणे अनिवार्य होते. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरे झिजवावे लागत आणि दीर्घ प्रतीक्षा करावी लागत असे. नव्या निर्णयामुळे राज्यातील शेकडो गृहनिर्माण संस्थांना मोठा फायदा होणार आहे. कागदपत्रे गोळा करणे आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे अनेक प्रकल्प रखडले होते, त्यांना आता गती येईल. सामान्य माणसाला स्वत:चे घर बांधताना आता महसूल विभागाच्या फे–या मारण्याची गरज नाही. बांधकाम आराखडा मंजूर झाला की ती जमीन आपोआपच अकृषक समजली जाईल. यापूर्वी जमिनीचा वापर बदलण्यासाठी अनेक कागदपत्रे गोळा करावी लागत होती, हे काम अतिशय किचकट आणि वेळखाऊ होते. या प्रक्रियेत अनेकवेळा सर्वसामान्यांची अडवणूक व्हायची. आता नव्या नियमांमुळे कामात सुसूत्रता येईल आणि कोणत्याही मध्यस्थाशिवाय सामान्यांची कामे वेगाने होतील. आता ज्यांना स्वत:चे घर बांधायचे आहे त्यांनी फक्त बांधकामाची मंजुरी मिळवणे पुरेसे आहे. प्रशासकीय अडथळे दूर झाल्यामुळे आता जमिनीचे व्यवहार आणि घरांची बांधकामे अधिक सुलभ होणार आहेत.

## पान १ वरून

### लाचखोर तहसीलदार...

पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे महसूल प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. तर गेल्या काही दिवसांत एसीबीच्या वाढत्या छाप्यांमुळे प्रशासनातील अधिकाऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. मात्र, अद्यापही सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकांचे काम करण्यासाठी पैशांची मागणी होत असल्याचं भीषण वास्तव आहे.

### चक्क मंडपात...

सगळ्यांनाच आश्चर्यकारक वाटणारा आहे. याबाबत शिक्षण विभाग आणि जिल्हाधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शिवनेरीव जाऊन...

कार्यक्रमाचे आयोजक गंगाधर नाना काळकुटे यांनी सांगितले की, येथून पुढे प्रत्येक वर्षी शिवजयंतीचा कार्यक्रम याच ठिकाणी अधिक भव्य आणि दिव्य स्वरूपात घेण्यात येईल. विविध क्षेत्रातील व्याख्याते बोलावून समाजप्रबोधनाचे कार्यक्रम राबविण्यात येतील. मराठा युवक व बहुजन बांधवांना दिशा देणारा हा उत्सव ठरेल. राजकारणविरहित शिवजयंती साजरी करून एक आदर्श पायंडा पाडल्याचेही त्यांनी नमूद केले. महिला वर्गाची लक्षणीय उपस्थिती आणि बालकलाकारांनी सादर केलेली विविध कलाप्रदर्शने हे या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. पारंपरिक शौर्यकला, सन्मान सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी सजलेला हा सुंदर व आकर्षक शिवजयंती उत्सव बीडकरांसाठी प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

### महावितरणच्या आश्वासनानंतर...

बसविण्याबाबतचा प्रस्ताव १९ डिसेंबर २०२५ रोजी महावितरण कंपनीच्या मुंबई येथील मुख्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. महावितरण कंपनीच्यावतीने होळचे कनिष्ठ अभियंता अभिजित पाटील यांनी लेखी स्वरूपात सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिल्यानंतर जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी सुरू केलेले बेमुदत ठिय्या आंदोलन स्थगित केले. मंजुरीनंतर तातडीने कामास प्रारंभ करून उपकेंद्राची क्षमता वाढविण्यात यावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान, रोहित्राची क्षमता वाढल्यास होळ परिसरातील शेतीपंप व घरगुती वीजपुरवठा अधिक स्थिर व सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### सलग दोन दिवस...

पुढे जाऊ देण्यास विरोध करण्यात आला. त्यानंतर संबंधित महिलांनी प्रमुख आरोपीला घटनास्थळी बोलावून घेतले. सर्व आरोपींनी मिळून भर रस्त्यात कोकाट यांना मारहाण केली. त्यांच्या डोक्यावर बोथट वस्तूने वार करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण उपलब्ध झाल्याने गुन्हा नोंदविणे व पुरावे गोळा करण्यास पोलिसांना मदत झाली. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वीही याच पीडितावर गंभीर हल्ला झाल्याची नोंद असून त्या प्रकरणी भारतीय दंड विधान कलम ३२६ अन्वये गुन्हा दाखल आहे. सलग दोन दिवस सार्वजनिक ठिकाणी गंभीर स्वरूपाची मारहाण झाल्याने प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून भारतीय दंड विधान कलम ३०७ (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणातील प्रमुख आरोपी विकी उर्फ पवन किशोर वीर (रा. नवनाथ नगर, चखऊ, बीड) यास ४८ तासांच्या आत अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला ५ दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मंजूर केली आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षी व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ व त्यांच्या पथकाने संयुक्तरीत्या पार पाडली. शहरात दहशत निर्माण करणाऱ्या अशा घटनांना आळा घालण्यासाठी पुढील प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### बीडमध्ये मध्यरात्री...

दरम्यान, सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी चोरट्यांचा शोध सुरू केला असून पोलिसांनी रात्रीची ग्रस्त वाढवावी अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

### एकमेकांत काठीने...

समितीचे अध्यक्ष आत्माराम वरणे यांनी ते दोन भाऊ, एका भावाची दोन मुले, गावातील प्रतिष्ठित व कुटुंबातील सदस्य यांच्यात बैठक सुरू असताना ज्ञानदेव मुंडे यांचा मुलगा लहू मुंडे हा म्हणाला, तुला एक इंचही जमीन देणार नाही. असे म्हणून त्याने बाजूला ठेवलेली काठी हातात घेऊन चुलते रामभाऊ मुंडे यांच्या डोक्यात मारली. तसेच ज्ञानदेव मुंडे आणि लहू मुंडे या दोघांनी पुन्हा रामभाऊ मुंडे आणि त्यांचा मुलगा अशोक याला हातावर काठीने मारहाण केली. त्या नंतर ज्ञानदेव मुंडे यांचा दुसरा मुलगा आनंद मुंडे याने देखील रामभाऊ मुंडे आणि त्यांचा मुलगा अशोक मुंडे यांना मारहाण केली. रामभाऊ मुंडे यांनी युसुफवडगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरुन ज्ञानदेव मुंडे, लहू मुंडे आणि आनंद मुंडे या तिघांच्या विरुद्ध गु. र. नं. ४४/२०२६ भा. न्या. सं. ११८(१), ३५१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार उपनिरीक्षक गोविंद बडे हे तपास करीत आहेत.

### पळून नेलेल्या...

वडिलांच्या तक्रारी वरून अल्पवयीन मुलीचे अज्ञात कारणासाठी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याची तक्रार युसुफ वडगाव पोलिस दि. २१ जानेवारी रोजी बेपत्ता झाली होती. त्या वरून गु. र. नं. २०/२०२६ भा न्या सं १३७(२) नुसार अज्ञात व्यती विरुद्ध अज्ञात कारणासाठी अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याचा गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांनी तपास करून अल्पवयीन मुलीचे अपहरणकर्ता सतीश निवृत्ती उजगरे (रा. पारडी माटेगाव ता. वडवणी) याला ताब्यात घेतले. अल्पवयीन मुलीच्या जवाबा वरून सतीश उजगरे याच्या विरुद्ध बळजबरीने शारीरिक संबंध करणे यासह पॉक्सोच्या कलम वाढ करण्यात आली आहे. अपहरणकर्त्याला न्यायालया समोर हजर केले असता त्याला दि. २७ फेब्रुवारी पर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## डोंगराच्या कुशीत वसलेल्या

# रुई गावाचा आदर्श घ्यावा-रिंकू राजगुरू



## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत कामांची केली पाहाणी

**वडवणी ।** प्रतिनिधी

डोंगराच्या कुशीत वसलेल्या रुई (पिंपळा) ग्रामपंचायतीने सर्वांगीण विकासाचा आदर्श निर्माण केला असून इतर गावांनी या गावाचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन सैराट फेम सिने अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. शुक्रवार दि. २० रोजी रुई पिंपळा येथे सिने अभिनेत्री रिंकू राजगुरु यांनी भेट देऊन विकास कामाची पाहणी केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, महात्मा गांधी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर गावातील उत्कृष्ट काम करणाऱ्या पाच आदर्श महिला बचतगटातील पाच महिलांचा पैठणी साडी देऊन रिंकू राजगुरू यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्लास्टिकमुक्त उपक्रमाची सुरुवात ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून प्लास्टिकमुक्त गावाच्या दिशेने पाऊल टाकत कापडी पिशवीचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी दाखवलेले मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक मान्यवर व अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी पाहिले व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळेतील डिजिटल विभागाचे उद्घाटन देखील केले. तसेच गावातील अंगणवाडीला देखील भेट दिली. व गावातील विविध विकास कामाची पाहणी करत तसेच सरपंच मयूर आंधळे यांनी परळी येथील महापशुधन एक्स्पोत गावातील १२० लोकांना पर्यटन सहलीसाठी घेऊन गेल्याने कौतुक करण्यात आले.अभिनेत्री रिंकू राजगुरु यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पुढे बोलताना अभिनेत्री रिंकू राजगुरू म्हणाल्या की,नरेगाच्या माध्यमातून रुई ग्रामपंचायतीने उल्लेखनीय काम केले असून ३१०० फळझाडांची लागवड करण्यात आली आहे.गावाला 'मॉडेल व्हिलेज' बनवण्यासाठी प्रयत्न सुरू असून जिल्ह्यात टॉप मध्ये स्थान मिळावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या. गाव सुंदर करण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न करा, गाव सुंदर कसे करता येईल आणि पारितोषिक आपल्या गावाला कसे मिळेल, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत. डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या रुई (पिंपळा) गावात सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत. या गावाचा आदर्श इतर गावांनी घ्यावा. त्यांनी सरपंच मयूर आंधळे यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे,गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सरपंच मयुर आंधळे, छायाताई शंकरराव आंधळे, सहाय्यक गटविकास अधिकारी पोहरेकर, विस्तार अधिकारी अशोक निरडे, बोरफडीचे सरपंच कैलास घुगे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड, पूजा खाडे, सविता लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच ड. मयूर आंधळे व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राठोड व विष्णू आंधळे सर यांनी केले. यावेळी महिला, तरुण, तरुणी व ग्रामपंचायत सदस्य आणि पंचायत समितीचे कर्मचारी, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# चिंचोटी येथे शिवाजी महाराज जयंती निमित्त महिलांच्या हस्ते महापुरुषांच्या चौकात ध्वजारोहण

## विद्यार्थ्यांच्या वेशभुषा ठरल्या मुख्य आकर्षक




**वडवणी । प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचोटी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उस्ताहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.यावेळी गावातील सर्व महापुरुषांच्या चौकात जिल्हा परीषद प्राथमीक शाळेत महिलांच्या शुभहस्ते ध्वजारोहण व प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.यावेळी गावातील लहान थोर महिला पुरुष मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या परीधान केलेल्या वेशभुषा सर्वांचे लक्ष वेधुन घेत होत्या. तालुक्यातील चिंचोटी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक,डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या महापुरुषांच्या चौकांची स्वच्छता करून आकर्षक रांगोळी काढत महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन गावातील उपस्थीत महीलांच्या शुभ हस्ते करण्यात आले.त्यानंतर सामुदायिक जिजाऊ वंदना घेण्यात आली.जिल्हा परिषद शाळेतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज माँ जिजाऊ,शिवबांचे मावळे यांच्या वेशभूषा परिधान केलेल्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.संपूर्ण गावात फेरी काडण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्ती गाण्यावर लेझीम जबरदस्त डान्स व काठीचा लेझर शो सादर करण्यात आला.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी माँ जिजाऊ,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवन पटला विषयी जबरदस्त भाषने करत उपस्थीतांकडुन टाळ्यांचा कडकडाट मिळवला. छत्रपती शिवाजी महाराज,माँ जिजाऊ,आण्णाभाऊ साठे संभाजी महाराज,डॉ बाबासाहेब आंबेडकर अदी महापुरुषांच्या जय घोषाने परिसर दणाणून गेला होता.या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांसह गावातील लहान थोर महिला पुरुष मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

## लिंबागणेश सेवा सहकारी सोसायटी अंतर्गत थकबाकी कर्जदारांनी आधारकार्ड तातडीने जमा करावे ; सुट्टीच्या दिवशीही अधिकारी गावात तळ ठोकून : चेअरमन रविंद्र निर्मळ यांचे आवाहन

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

निसर्गाच्या लहरीपणामुळे निर्माण झालेल्या अवकाळी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाने दिलासा देत सेवा सहकारी सोसायट्यांअंतर्गत थकीत कर्जदारांना कर्जमाफी जाहीर केली आहे. त्यानुसार लिंबागणेश सेवा सहकारी सोसायटी अंतर्गत येणाऱ्या लिंबागणेश, पोखरी, पिंपरनई, सोमनाथवाडी, बेलगाव, काळवाडी, फुकेवाडी व बांगरवाडा येथील शेतकरी कर्जदारांनी आपले आधारकार्ड तातडीने जमा करावेत, असे आवाहन सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी केले आहे. सकाळपासून बीड जिल्हा मध्यवर्ती



बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद ठोंबरे, नेकनूर शाखा अधिकारी बापू वाघमारे तसेच रोखपाल राम शिंदे व रामराव वायभट हे लिंबागणेश येथे तळ ठोकून कार्यवाही करत आहेत. सोसायटीअंतर्गत एकूण ३७७ थकीत खातेदार असून, सायंकाळपर्यंत ७५ खातेदारांनी आधारकार्ड झेरॉक्स जमा केली आहे. उर्वरित थकबाकी कर्जदार शेतकऱ्यांनी आपले आधारकार्ड उद्यापर्यंत चेअरमन रविंद्र निर्मळ यांच्याकडे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, माजी चेअरमन दशरथ दाभाडे, दादा गायकवाड, सुरेश निर्मळ, संतोष भोसले, भगवान मोरे, संजय पावले आदींनी थकीत कर्जदारांच्या यादीतील नावे शोधून दूरध्वनीद्वारे संपर्क साधत आधारकार्ड झेरॉक्स गोळा करण्यासाठी परिश्रम घेतले. दरम्यान, दि.१९ रोजी शिवजन्मोत्सवाच्या सुट्टीच्या दिवशीही अधिकारी लिंबागणेश येथे तळ ठोकून शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कार्यरत असल्याबद्दल डॉ. गणेश ढवळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले.

## जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुल, परभणी येथे शिवजयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**




जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुल येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, शौर्य, न्याय व लोककल्याणाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात व ऐतिहासिक अभिमानाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवप्रतिमेचे पूजन करून स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या प्रेरणादायी विचारांनी वातावरण भारावून गेले. रायरेश्वर मंदिरात बालवयात घेतलेली स्वराज्याची शपथ, तोरणा किल्ल्याच्या विजयाने सुरू झालेला पराक्रमाचा प्रवास, अफजलखान वधातील धैर्य, आग्र्यातील नजरकैदेतून केलेली सुटका आणि अष्टप्रधान मंडळाद्वारे उभारलेले सुशासन या सर्व ऐतिहासिक घटनांचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना शिवचरित्रातील दूरदृष्टी, संघटनकौशल्य आणि सर्वधर्मसमभाव यांची प्रेरणा देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य मा. उत्तरेश्वर शिंदे सर होते. प्रमुख उपस्थितीमध्ये विभाग प्रमुख अशोक दुधारे, संदीप कराळे, रामकृष्ण कदम, नितेश देशमुख व ओमप्रकाश सुरवंशी सर यांची उपस्थिती लाभली.

विद्यार्थिनी धनश्री कराळे, सायली देशमुख, नंदिनी वाघमारे ,श्रुती नरवाडे, रेणुका सूर्यवंशी यांनी शिवचरित्रातील पराक्रम, स्त्री-सन्मानाची भूमिका, शत्रूप्रती उदार धोरण आणि लोकहिताचा राज्यकारभार यावर प्रभावी मनोगते व्यक्त केली जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. गोपीकिशन शिंदे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्वधर्मसमभावाच्या धोरणाचा उल्लेख करताना मुस्लिम सरदारांनाही दिलेले महत्त्व, मशिदींचे संरक्षण आणि शिस्तबद्ध प्रशासन यांची ऐतिहासिक उदाहरणांसह मांडणी केली❋. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमाचे प्रतीक नसून आदर्श प्रशासन, सामाजिक न्याय आणि राष्ट्रनिष्ठेचे जाज्वल्य उदाहरण आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवाजी बोबडे सर यांनी प्रभावी शैलीत केले. या ऐतिहासिक प्रेरणादायी सोहळ्यासाठी सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिवजयंती उत्सवाने विद्यार्थ्यांच्या मनात स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि कर्तृत्वाची नवी ज्योत प्रज्वलित केली.

## माजलगाव मध्ये शिवजयंतीच्या निमित्त रेकॉर्डब्रेक रक्तदान

### पाटील साहेब प्रतिष्ठान आयोजित शिबीरात १५५ शिवभक्तांच रक्तदान



**माजलगाव । प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्थान चे आराध्य दैवत व स्फूर्ती स्थान,श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पाटील साहेब प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिर, सेल्फी पॉईंट तसेच कै. वैभव राऊत यांच्या स्मरणार्थ खिचडी वाटप चे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी करण्यात आले होते. गेल्या सात वर्षापासून पाटील साहेब प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. याही वर्षी त्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या रक्तदान शिबिरात तब्बल १५५ जणांनी रक्तदान केले. यामध्ये महिला भगिनींनी देखील उपस्थित राहून रक्तदान केले. तसेच गरजुंना रक्ताची गरज भासल्यास कुठेही ब्लड बॅग उपलब्ध करून देण्यात येईल, त्यासाठी आपण पाटील साहेब प्रतिष्ठानशी संपर्क साधावा असेही आव्हान केले आहे. या शिबिरास युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके, माजलगाव शहर पोलिस स्टेशन पोलिस उपनिरीक्षक राहुल सुर्यतळ साहेब, जेष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके, अशोक आबा डक, अरुण आबा राऊत, अशोकराव तिडके, कल्याणराव आबुज आदींनी शिबिरास भेट देऊन मार्गदर्शन केले.

या रक्तदान शिबिराचे तसेच विविध कार्यक्रमचे आयोजन प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष श्रीराम नरवडे, युवा सेना जिल्हाप्रमुख शुभम डाके. मयुर आमसुले, बाळासाहेब निंबाळकर, भगवान नवले, दिपक जाधव, सागर गायकवाड, गणेश पायघण, विश्वजीत होके, अजय नरवडे, नारायण होके, गणेश तौर, उदय नरवडे, गणेश शेळके, बलराम मानधने, सोमेश घेवारे, विक्की दहिवाळ, डॉ .सुरज बादाडे, कार्तिक फपाळ, अशोक मोरे, करण थोरात, नारायण धिरडे, केशव साळुंके, संतोष धिरडे, विक्रम थोरात, गोविंद लोखंडे, लक्ष्मण मस्कर, योगेश डाखुरे, माऊली काळे, गणेश अनभुले, लखन अनभुले, विकास शेरकर, केशव कर्डिले, उत्तम भोसले, लखन राऊत, किरण शेजुळ यांनी केले. तसेच विशेष सहकार्य शितल मंडप डेकोरेट्स माजलगाव यांचे लाभले.

## जि.प.प्रा.शाळा नागरगोजे वस्ती येथे शिवजयंती उत्साहात साजरी

### शिवशाही पोशाख, भगवे ध्वज, लेझीम नृत्य,माता पालकांचा उत्स्फूर्त सहभाग

**आष्टी । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील जि.प.प्रा. शाळा नागरगोजे वस्ती या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांचे पोशाख परिधान करून शिवजयंती मोठ्या थाटामाटात साजरी झाली.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जय भवानी जय शिवाजी अशा गगनभेदी घोषणेने वातावरण शिवमय झाले होते.यावेळी

.शिवरायांच्या गितावर विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. शिवकालीन पोशाखात जि.प.प्रा.शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी लक्ष वेधून घेतले.



महाराजांच्या प्रतिमेची विधीवत पूजा करत पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक बाजीराव माळवे, आदर्श शिक्षिका रंजना सांगळे, कऱ्हेवडगाव स. सो. चे व्हा.चेअरमन परमेश्वर नागरगोजे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन नागरगोजे, पत्रकार संतोष नागरगोजे,अनिल नागरगोजे , गणेश सांगळे, नागरीकांसह तरुण, महिला पालक सहभागी झाल्या होत्या.

## जाहीर प्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ७वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९५३/२०२५**

**सुशिला व इतर विरूध्द निरंक**

अर्जदार – **१. सुशिला भ्र. संतराम बाबर, वयः ७७ वर्षे, धंदा घरकाम, रा. नबापुर (बोरदेवी) ता.जि.बीड. २. सुनिता भ्र. धोंडीराम शिंदे, वयः ५५ वर्षे, धंदा: शेती, रा. सदर, ३. डर्मिला भ्र. राजाभाऊ शिंदे, वयः ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. देवळा बु. ता. वडवणी जि.बीड. ४. गंधारी भ्र.बळीराम देवकते, वयः ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. ढोरवाडी ता. वडवणी जि. बीड.**

विरुध्द

गैरअर्जदार– निरंक

**मागणी – वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत संतराम पि.नानाभाउ बाबर, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **संतराम पि. नानाभाउ बाबर, यांचा मृत्यु दि. ०२/१०/२०२३ रोजी नबापुर (बोरदेवी) ता. जि. बीड.** येथे मयत झालेले असून अर्जदार मयत संतराम पि. नानाभाऊ बाबर, यांचे नातेवाईक आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत संतराम पि. नानाभाउ बाबर, नबापुर (बोरदेवी) ता. जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०४ माहे ०२ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २३/०३ /२०२६ आहे.**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**स. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रा.) बीड**

**निविदा सुचना**

वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बीड अंतर्गत असलेल्या नियत क्षेत्रातील खालील कामांकरीता मोहोरबंद खुल्या पद्धतीच्या निविदा (बी 1) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय निव्वळ कामाची रक्कम (रू.) | बयाना रक्कम (रू.) | निविदा फॉर्म किंमत (रू.) |
|---|---|---|---|---|
| 1 | चकलंबा कं. नं. 503 A मधिल गॅबियन बंधारा बांधणे | 100108 | 1001 | 100 |
| 2 | चकलंबा पुर्व पावसाळी रोपवन कामे 14.47 हे. कं. नं. 503 B (भाग 3) मधिल मृद संधारणाची कामे | 230960 | 2309 | 100 |
| 3 | वडगाव ढोक पुर्व पावसाळी रोपवन कामे 9.13 हे. कं. नं. 501 मधिल मृद संधारणाची कामे | 145726 | 1457 | 100 |

**अटी व शर्ती:**

1. आवश्यक त्या विभागाचा चालु नोंदणीकृत (सुशिक्षित बेरोजगार/खुला कंत्राटदार/मजुर संस्था) ठेकेदार निविदा भरण्यास पात्र असेल.
   अ) को-या निविदा अर्ज विक्री दि. 21/02/2026 सकाळी 10.00 वाजेपासुन ते दि. 27/02/2026 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत केवळ कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत वनपरिक्षेत्र कार्यालय (प्रा.) बीड कार्यालयात उपलब्ध होतील.
   ब) मोहरबंद निविदा अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि. 27/02/2026 रोजी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत.
   क) निविदा उघडण्याचा दि. 02/03/2026 रोजी कार्यालयीन वेळेत किंवा प्रशासकीय सोयीनुसार.
2. निविदा पोटी बयाना रक्कमेच्या डी. डी. ची मुळ प्रत व ठेकेदाराचे आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती लिफाफा क्र. 01 च्या आत ठेवून व या लिफाफ्यावर अनामत पावतीचा तपशिल लिहुन लिफाफा क्र. 01 व लिफाफा क्र. 02 निविदा अर्ज परिपुर्ण भरून सर्व सीलबंद करून वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बीड कार्यालयात दाखल करावेत.
3. बयाना रक्कमेचा डी. डी. हा कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बँकेचा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बीड यांचे नावाने सादर करावा.
4. सदर कामाचा कालावधी हा चालु 2025-26 या वर्षाचा असनु सर्व कामे याच वर्षात पुर्ण करणे बंधनकारक राहील.
5. सदरील कामे करतांना शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेले कायदे, नियम, शासन निर्णय, परिपत्रक व इतर मध्ये दिलेल्या सुचनेनुसारच कामे करणे बंधनकारक आहे.
6. या जाहिराती बाबत अधिक माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) बीड यांच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आलेली आहे व अधिकच्या माहितीसाठी या कार्यालयास संपर्क करावा.
7. प्राप्त निविदा पैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारण्याचे अधिकार वन विभाग (प्रा.) बीड मधिल संबंधित वन अधिकारी यांनी राखुन ठेवले आहे. याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)
बीड

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. २१ फेब्रुवारी २०२६ ●

## थोडक्यात...

### महेक नविज शेख या चिमुकलीचा पहिला रोजा (उपवास) संपन्न



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील महेक नविज शेख वय वर्षे पाच या चिमुकलीने आपल्या आयुषाचा पहिला रोजा (उपवास) दिनांक २०/२/२००२६ रोजी पुर्ण केला. या बद्दल सर्व स्तरातुन महेक नविज शेख या चिमुकलीचे कवतुक करण्यात येत असुन समाजातील शेख परिवारातील हितचिंतकांनी महेक या बाळाला आयुषातील पहिला रोजा (उपवास) पुर्ण केल्यामुळे भर भरुन शुभेच्छा दिल्या आहेत.

### आष्टी ग्रामीण रुग्णालयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिर: वैद्यकीय अधीक्षक डॉ. मोराळे



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील महिलांच्या आरोग्य संरक्षणा सोबतच कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी 'एक टाका दुर्बिणीने' कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांनी दिली. हे शिबिर आधुनिक दुर्बिण (लॅप्रोस्कोपी) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने पार पाडण्यात येणार असून, या पद्धतीत अत्यल्प वेळेत आणि कमी वेदनेत शस्त्रक्रिया पूर्ण होते. या प्रक्रियेत फक्त एक छोटासा टाका देऊन शस्त्रक्रिया केली जाते, त्यामुळे महिलांना लवकर आराम मिळतो तसेच रुग्णालयात जास्त काळ राहण्याची गरज भासत नाही. या शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार असून, सर्व शस्त्रक्रिया सुरक्षित व शासकीय नियमानुसार मोफत करण्यात येणार आहेत. शस्त्रक्रियेनंतर आवश्यक औषधे, तपासण्या व मार्गदर्शनही रुग्णालयामार्फत विनामूल्य देण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या नियमानुसार पात्र लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर आर्थिक लाभही देण्यात येणार असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. या शिबिरात सहभागी होण्यासाठी इच्छुक महिलांनी आपल्या जवळच्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका किंवा ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे संपर्क साधावा.

## तहसीलदार शेळके यांच्या हस्ते जिव्हाळा केंद्रात बेघरांना अनुदान मंजुरीपत्र वाटप...

# वयोवृद्धांचे भावनिक आशीर्वाद

**बीड । प्रतिनिधी**

जिव्हाळा केंद्रामध्ये निराधार व निराश्रीत नागरिकांसाठी दिलासा देणारे मंजुरी आदेश वितरण कार्यक्रम अत्यंत आपुलकीच्या आणि भावनिक वातावरणात पार पडला. श्रावणबाळ योजना आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अधिकृत मंजुरी आदेश प्रदान करण्यात आले . या कार्यक्रमामुळे अनेक वयोवृद्ध , दिव्यांग , निराधार आणि गरजू नागरिकांच्या जीवनात आर्थिक आधाराची नवी आशा निर्माण झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कनवाळू आणि लोकाभिमुख भूमिकेमुळे जिल्ह्यातील दुर्बल घटकांपर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे



पोहोचत आहेत . गरजूंपर्यंत शासनाचा हात पोहोचावा , या उद्देशाने त्यांनी सातत्याने प्रशासनाला संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जिव्हाळा केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत विशेष जिव्हाळा दाखवत जास्तीत जास्त करून दाखवण्याची भूमिका घेतली असून निराधार नागरिकांच्या अडचणींना प्राधान्य देण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे बेघर आणि निराधार घटकांविषयी विशेष आपुलकी व्यक्त करत त्यांना केवळ आर्थिक मदतच नव्हे तर सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे असे मत मांडत असतात . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही गरीब आणि गरजू घटकांप्रती कनवाळू दृष्टिकोन ठेवत प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची गरज अधोरेखित केली आहे. समाजातील बेघर , अनाथ , अपत्यहीन , निराधार , निराश्रीत वृद्ध व्यक्तींसाठी जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून हे केंद्र रेणुका माऊली सेवाभावी संस्था व नगर परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने चालविले जात आहे . या केंद्रामध्ये स्वतंत्र इमारत असून त्यामध्ये स्वयंपाक गृह , भोजन कक्ष , कोठीघर यांसह दोन मजली इमारतीत कार्यालय , स्नानगृहे व मुबलक प्रमाणात शौचालये उपलब्ध आहेत . याशिवाय मनोरंजन कक्ष , वैद्यकीय सेवा , वाचनालय , बाग-बगिचा तसेच संबंधित कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय करण्यात आलेली आहे. येथे प्रत्येक राहणाऱ्या बेघर व्यक्तीस झोपण्यासाठी पलंग , सतरंजी , गादी , उशी , बेडशीट , चादर , कपाट , ब्लँकेट यांची सुविधा देण्यात येते . तसेच ताट , वाटी , तांब्या , बादली यांसारख्या मूलभूत गरजांचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे . रस्त्याच्या कडेला , बसस्थानक परिसरात , पुलाखाली किंवा अडचणीच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या निराधार नागरिकांना या केंद्रात प्रवेश देण्यात येतो . त्यामुळे बेघरांना सुरक्षित निवारा मिळण्यास मदत होत आहे. या कार्यक्रमात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते मदन मारोती जाधव , रघुनाथ वामन वाघमारे , मुमताज कटाळु शेख , रामकिसन महादेव पुरी , अरविंद दत्तात्रय राजंकर , शिवाजी यशवंता शिंदे , बाली बारीक सारूक , रईसा मेहमुद पठाण , अनिल चंद्रकांत साळवे आणि सुशाला अशोक जाधव या लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वितरित करण्यात आले . मंजुरी आदेश मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि कृतज्ञतेचे भाव स्पष्ट दिसून आले. निराधार नागरिकांच्या आयुष्यात नवे समाधान फुलल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली.

# आष्टीच्या कृषी प्रदर्शनाला मंत्री, आमदार यांनी पाठ फिरवली

### शेतकरी यांची कमी उपस्थिती पण संस्थेच्या कर्मचाऱ्यांची मोठी संख्या

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथे गेल्या दोन वर्षापासून राज्यस्तरी रामानाथन कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले पण या कृषी प्रदर्शनच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी राज्यातील विविध मंत्री, आमदार यांना आयोजकांनी भेट घेऊन निमंत्रित करण्यात आले होते पण यावेळी या उद्घाटनप्रसंगी विविध मंत्री व जिल्ह्यातील आमदार यांनी आपली उपस्थिती दाखवली नसल्याने या कार्यक्रमाला पाठ फिरवली असल्याचे दिसून आले आहे. आष्टी तालुक्यात गेल्या दोन वर्षापासून राज्यस्तरी कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात येते पण या कृषी प्रदर्शनाची तयारी जोरदार करण्यात आली होती पण या कृषी प्रदर्शनाला राज्यातील विविध खात्यांतील मंत्री, आमदार, वरीष्ठ शासकीय अधिकारी यांनी यानवेळी कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थिती न दिल्याने या कृषी प्रदर्शनात शेतकरी यांची संख्या कमी दिसत होती पण संस्थेतील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर संख्या दिसून येत असून या कृषी प्रदर्शनाचा लाभ संस्थेतील कर्मचारी हेच घेत असल्याचे शेतकरी व तालुक्यातील जनतेतून बोलले जात आहे.

## बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी केवायसी करून घेऊन मुख्यमंत्री देवाभाऊ उपमुख्यमंत्री शिंदे साहेब उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या सरकारने घेतलेल्या शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाचा...

# बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपापली केवायसी करून फायदा घ्यावा : मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

सध्या भारतामध्ये स्वतंत्र भारत देशाचे लोकप्रिय मा पंतप्रधान मा नरेंद्र जी भाई मोदी साहेबांचे देव देश धर्म यासाठी सातत्याने लोकांच्या हिताचे काम करणारे सरकार असून त्यांच्याच पावलो पावली चालणारे महाराष्ट्र राज्याचे राज्य सरकार देखील देवा भाऊचे आहे महाराष्ट्राला लाभलेले अतिशय उत्कृष्ट सुसंस्कृत अभ्यासू लोकप्रिय असलेले मा श्री मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस साहेब उर्फ सर्वांचे लाडके देवा भाऊ व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व महाराष्ट्राच्या राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनिता ताई पवार यांच्या मंत्रिमंडळाने सध्या महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतलेला असून लवकरच शेतकऱ्यांची कर्जमाफी आता



होणार असल्याचे संकेत सरकारकडून मिळत असल्यामुळे बीड जिल्ह्यातील तमाम सर्व शेतकरी बांधवांनी आपापली केवायसी करून आधार कार्ड लिंक असलेल्या खात्याची खात्री करून केवायसी करून घेणे बंधनकारक असल्याचे सरकारकडून बोलले जात आहे म्हणून बीड जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा या उद्देशाने बीड जिल्ह्यामध्ये सातत्याने देव देश धर्म यासाठी कार्य करत असलेले बीड जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांच्या सुखदु:खामध्ये सातत्याने सहभागी होणारे व प्रत्येकाला वेळोवेळी उत्कृष्ट असी मदत करणारे व महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरण कॅबिनेट मंत्री श्रीमती नामदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये व गावोगावी प्रत्येक



*माजलगाव गव्हाणथडी येथील श्रीमती राधाबाई त्रिंबकराव पाटील पाटेकर यांचे दुःखद निधन झाले असता सांत्वन पर भेट देताना माजी सभापती नितीन दादा नाईकनवरे, श्रीहरी पाटेकर, सिद्धेश्वर पाटेकर , प्रकाश नेहरकर, त्रिंबक धिरडे अशोकराव माने लहू राजे तांबे व इतर सर्व*

# सर्व जाती-धर्मांच्या लोकांना सोबत घेऊन शिवरायांनी स्वराज्य निर्माण केले : प्रा. पंजाब येडे

**वडवणी । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचा इतिहास हा सामाजिक समतेचा आणि सर्वसमावेशकतेचा प्रेरणादायी आदर्श मानला जातो. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य उभारताना कोणत्याही जाती-धर्माचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी दिली.

शिवरायांच्या सैन्यात विविध धर्म आणि समाजघटकांतील सैनिक कार्यरत होते. प्रशासनातही गुणवत्तेला प्राधान्य देत विविध समाजातील लोकांना जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. त्यांनी सर्व जाती-धर्मांतील लोकांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले. असे प्रतिपादन प्रा. पंजाब येडे यांनी केले. येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थाध्यक्ष रमेश भाऊ पोकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर प्रमुख पाहुणे म्हणून हनुमान मुळीक, बालूशेठ लाटे, सचिव प्रा. गणेश पोकळे,प्रशासकीय अधिकारी प्रा. बप्पासाहेब हावळे,प्र. प्राचार्य रफिक सय्यद हे उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा. येडे म्हणाले की, शिवरायांच्या राज्यकारभारात न्याय, शिस्त आणि सर्वधर्मसमभाव यांना विशेष महत्त्व होते. मंदिरांप्रमाणेच मशिदी आणि इतर धार्मिक स्थळांचे रक्षण करण्याचे आदेश देऊन त्यांनी धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श घालून दिला. सामाजिक ऐक्याचे प्रतीक ठरले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बप्पासाहेब हावळे यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. अतुल रसाळ यांनी केले. शेवटी आभार प्रा. रफिक सय्यद यांनी मानले. कार्यक्रमाला प्र. प्राचार्या कोमल सुरवसे, प्रा. सुहास गाढवे, प्रा. सय्यद अफरोज, दिपक जाधव, मंगेश खराडे, शंकर इंगोले, संध्या पोकळे, सचिन चौरे यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# न्याय, स्वाभिमान आणि स्त्रीसन्मान हीच स्वराज्याची खरी ओळख : प्रा.अंकुश निर्मळ

### राजे मल्हारराव होळकर निवासी वसतिगृहात शिवजयंती सोहळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात स्वराज्याची प्रेरणा जागवण्याचे महान कार्य राजमाता जिजाऊंनी केले. रयतेला न्याय, महिलांना सन्मान आणि समाजात स्वाभिमान निर्माण व्हावा, याच उदात्त ध्येयातून स्वराज्याची संकल्पना आकारास आली, असे प्रतिपादन धनगर कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.अंकुश निर्मळ यांनी केले. तुलसी शैक्षणिक समूह संचलित राजे मल्हारराव होळकर निवासी वसतिगृह, बीड येथे गुरुवार दि. १९ रोजी शिवजयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान व बक्षीस वितरण



सोहळ्यात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते.तर, प्रमुख अतिथी म्हणून मल्हार सेना बीडचे जिल्हाप्रमुख मा.अमर ढोणे, मा.बळीराम खरात, डॉ.सुनील जोंधळे तसेच प्रा.डी.डी.राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.किशोर वाघमारे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा.गीतांजली वाघमारे तर आभार प्रदर्शन प्रा.डी.डी. राऊत यांनी मानले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी प्रा.मगन ओव्हाळ, सत्यजित सावंत, आरती सावंत, वर्षा ढोकणे, शीतल खराद व गौरव विद्यागर यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.गोविंद बावस्कर व डॉ. कुंडलिक खेत्री लिखित ग्रंथास जय जोशी उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ पुरस्कार

### सिन्नर येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेत सदरील संदर्भ ग्रंथाचा गौरव

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. गोविंद बावस्कर व समाजशास्त्र विभागातील डॉ. कुंडलिक खेत्री यांच्या भारतीय समाजरचना: पारंपारिक व आधुनिक या पुस्तकास जय जोशी उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ पुरस्कार २०२६ या पुरस्काराने सिन्नर येथे आयोजित मराठी समाजशास्त्र परिषदेत गौरविण्यात आले. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने दिला जाणारा जय जोशी उत्कृष्ट संदर्भ ग्रंथ पुरस्कार -२०२६ या पुरस्कारासाठी भारतीय समाज रचना : पारंपारिक व आधुनिक या



संदर्भ ग्रंथास देण्यात आलेला आहे. भारतीय समाजरचना: पारंपरिक व आधुनिक हे या लेखकद्वयाचे पहिले पुस्तक वाचकांच्या आणि अभ्यासकांच्या दृष्टिने महत्वाचे असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, समाजशास्त्र विषयाच्या जून २०२५ पासून बी. ए. द्वितीय वर्षाकरिता सेमिस्टर पॅटर्नप्रमाणे अमलात येणाऱ्या छएझ-२०२० अभ्यासक्रमानुसार या पुस्तकाचे लेखन केले असले तरी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाच्या समाजशास्त्र विषयाकरिता हे पुस्तक उपयुक्त आहे. तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक उपयुक्त ठरेल. या पुस्तकाच्या माध्यमातून भारतीय समाजाची ओळख व्हावी या उद्देशाने संबंधित पुस्तकाचे लिखाण केले आहे. एकूण सात प्रकरणांमध्ये पुस्तकाची रचना करण्यात आली आहे. या पुस्तकात जास्तीत जास्त वर्तमान संदर्भ घेण्याचा प्रयत्न केला आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या ३५ व्या राष्ट्रीय अधिवेशनात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी मराठी समाजशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. लक्ष्मण सिंग साळोक ,सचिव डॉ. कालिदास भांगे ,कोषाध्यक्ष डॉ. प्रियदर्शन भवरे, कानपूर विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ. तेजबहादुर सिंग , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. संजय कोळेकर ,वर्धा येथील महात्मा गांधी राष्ट्रीय विद्यापीठाचे डॉ. दिगंबर तंगलवाड, महाविद्यालयाची प्राचार्य तथा स्वागत अध्यक्ष डॉ. विनोद निर्भवणे सहकार्य वाहक डॉ. वाल्मिक इंदासे आणि परिषदेची सर्व कार्यकारणी यांच्या हस्ते दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सन्मानित करण्यात आला.